VOLUME - XI, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2023
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.538 (www.sjifactor.com) AP-03

# १२. महात्मा फुलेंचे शिक्षणासंबंधीचे विचार

**मोहिते दिगंबर तुळशीदास**
इतिहास विभाग, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

**प्रस्तावना**

19 वे शतक हे प्रबोधनाचे शतक म्हणून ओळखले जाते. पाश्चात्य शिक्षणाने भारतातील सामाजिक - धार्मिक क्षेत्रात परिवर्तन घडून आले. या परिवर्तनामध्ये पंडिता रमाबाईंचे कार्य उल्लेखनीय होते. तसेच त्यांच्या समकालिन राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन, ईश्वरचंद्र विदयासागर, लोकहितवादी, वि.रा.शिंदे, महर्षी कर्वे, यांच्यापैकी महात्मा फुले कार्याचा विचार केल्याशिवाय 19व्या शतकातील सामाजिक - धार्मिक सुधारणांचा अभ्यास पुर्ण होऊ शकणार नाही. म्हणून मी प्रस्तूत शोधनिबंधातून महात्मा फुलें शैक्षणीक विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**19व्या शतकाची सामाजिक पार्श्वभूमी**

17 व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी 18 पगड जातींना सोबत घेऊन मराठा राज्याची निर्मिती केली. याच राज्याचे पुढे पेशवाकालखंडात पेशव्यांनी साम्राज्यात रूपांतरण केले हे जरी खरे असले छत्रपती शिवाजी महाराजांच्या सामाजिक विचारांना पेशव्यांनी तिलांजली दिली हेही तितकेच खरे आहे.

दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या राजकीय कारकीर्दीत (1796 - 1818) अस्पृश्य वर्गावरील सामाजिक बंधना संदर्भात धनंजय कीर म्हणतात. महारमांगांना तर गळयात मडकूले आणि कमरेभवती झाडाची फांदी बांधून, दिवसा माणसाची सावली मोठी पडत नसते तेंव्हा पुणे शहरात फिरण्याची मोकळीस असे १

स्त्रीयांच्या सामाजिक स्थिती बाबत धनंजय कीर लिहितात त्या रावबाजीच्या अपेक्षीत भेटीच्या भयामुळे वाईतील अनेक महिलांनी विहिरीत उडया टाकून जीव दिला..२ इ.स. 1818 मध्ये मराठा राज्याचा ऱ्हास झाल्यानंतर मराठा राज्यातील स्त्रीयांनी रावबाजी अर्थात दुसऱ्या बाजीरावा बददल काढलेले उदगार महत्वाचे आहेत. त्या म्हणतात बाजीरावाचे आता पुण्यात राज्य नाही चांगले मेल्याचे तळपट झाले. मोठा चांडाळ होता तो.३

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणामध्ये केलेल्या सामाजिक क्रांतीचे महत्व आपणांस कळते. भारतातील 19वे शतक हे प्रबोधनाचे शतक होते महात्मा फुलेंचे शिक्षण क्षेत्रातील विचार पाहण्यापूर्वी आपणास प्रबोधन म्हणजे काय? हे पहावे लागेल.

**प्रबोधन**

प्रबोधनाची व्याख्या स्पष्ट करताना एच.ए.डेव्हिस म्हणतात. – 'प्रबोधन म्हणजे मानवास प्राप्त झालेली सुबुध्द अवस्था होय.' प्रबोधन म्हणजे परिवर्तनवादी,सुधारणावादी,नवनिर्मितीवादी व मानवतावादी कृतिशील बौध्दिक क्रांती होय.'४



Scanned with OKEN Scanner

**युरोपियनांचे भारतातील आगमन व खिस्ती मिषनऱ्यांचे कार्य**

22 मे 1498 रोजी भारतातील कालिकत बंदरामध्ये पोर्तुगीज प्रवासी वास्को द गामाच्या रूपाने युरोपियन भारतातील पहिले पाऊल ठरले. यानंतर थोडयाच कालावधीत डच,इंग्रज,फ्रेंच भारतात व्यापाराच्या निमित्ताने आ व्यापाऱ्यांच्या मागोमाग खिस्ती मिशनऱ्यांचे भारतात आगमन झाले.

20 फेब्रवारी 1707 रोजी मोगल सम्राट औरंगजेबाचे निधन झाले आणि मोगल साम्राज्याचा ऱ्हासाकडे प्रवास सुरू झाला. या घटनेचा सर्वाधीक लाभ मराठयांनी आणि युरोपियनांनी घेतला.1757 च्या प्लासीच्या लढाईने ब्रिटिशांनी भारतातील ब्रिटिश साम्राजाचा पाया घातला तर 1765 मध्ये संपूर्ण बंगाल प्रांत आपल्या हाती घेतला.याच पार्श्वभूमीवर युरोपियन खिस्ती मिशनऱ्यांनी भारतातील सामाजिक कार्याला सुरवात केली. बंगाल प्रंतात सर्वप्रथम शाळा सुरू केले याच शाळांमधून भारतातील समाजसुधारकांची पहिली पिढी निर्माण झाली.

19व्या शतकातील हिंदू मुलींकरिता पहिली शाळा कलकत्यात 1819 साली अमेरिकन मिशनने सुरू केली. तर पुण्यात खिस्ती धर्मोपदेशकांनी 1824 मध्ये मराठी शाळा काढल्या.६ तर 1840 मध्ये अमेरिकन मिशनने पुण्यात शाळा सुरू केल्या.7 अशाच खिस्ती मिशनऱ्यांनी सुरू केलेल्या शाळेत 1841 मध्ये महात्मा फुलेंनी प्रवेश घेतला. शालेय जीवनात त्यांनी थॉमस पेन लिखित Right of Man नावाचा ग्रंथ वाचला आणि त्यामुळे भारताला पहिला महात्मा मिळाला. खिस्ती मिशनऱ्यांनी भारतात सामाजिक कार्य केले असले तरी त्यांचा खरा हेतू स्पष्ट करताना लॉर्ड एलेनबरो म्हणतात. 'शिक्षण प्रसार करण्यात मिशनऱ्यांचा खरा हेतू लोकांना बाटवणे हाच असतो.9

खिस्ती मिशनऱ्यांचे कार्य सुरू असतानाच ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतातील शिक्षणची सुरवात केली.

**पाश्चात्य शिक्षणाची सुरवात**

1813 सालचा नियामक कायदा मुक्त व्यापारासाठी जसा ओळखळा जातो तसाच तो ब्रिटिशांनी भारतातील शिक्षण क्षेत्रासाठी केलेल्या आर्थिक तरतुदीसाठीही ओळखळा जातो.इस्ट इंडिया कंपनीसरकारच्या 1813च्या सनदे अन्वये असे ठरले की,'भारतातील शिलकी महसूलापैकी प्रत्येक वर्षी कमीतकमी एक लक्ष रूपयांची रक्कम वेगळी काढावी तिचा उपयोग भारतातील प्राच्यवाड.मयाचे पुनरूज्जीवन नि वृध्दी करण्यासाठी तसेच पंडितांना उत्तेजन देण्यासाठी आणि भारतातील रहिवाशांमध्ये शास्त्राचे ज्ञान सुरू करून त्याचा प्रसार करण्यासाठी करण्यात यावा10

या ठिकाणी विशेष लक्षात घेण्यासारखी महत्वाची बाब ही की, ब्रिटनमध्येही 1833 सालपर्यंत शाळांना अनुदान देण्याची प्रथा नव्हती.11 मात्र भारतात ब्रिटिशांनी शिक्षण क्षेत्रासाठी लक्षणीय आर्थिक तरतुद केली. यातूनच पुढे भारतीय शिक्षणाचा प्रवास सुरू होतो. मात्र एक प्रश्न होता.तो असा की, भारतीयांना कोणत्या माध्यमातून शिक्षण दयावे ? त्यावेळी थॉमस बेबिंगटन मेकॉले यांच्या नेतृत्वाखाली समिती घटित करण्यात आली. या समितीमध्ये दोन मतप्रवाह होते. एक गट भारतीयांना पाश्चात्य भाषेतून शिक्षण दयावे या मताचा होता आणि दुसरा मतप्रवाह भारतीयांना प्रादेशिक भाषेतून शिक्षण दयावे या मताचा होता. शेवटी मेकॉलेने भारतीयांना पाश्चात्य भाषेतून शिक्षण देण्याचा निर्णय 7 मार्च 1835रोजी घेतला.त्यानुसार भारतीय शिक्षणाची सुरवात झाली.



Scanned with OKEN Scanner

**महात्मा जोतिराव फुलेंचे षिक्षणा बाबतीचे विचार**

भारतातील स्त्री शिक्षणाचे आदय प्रवर्तक म्हणून आपण महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना ओळखतो. जोतिराव व सावित्रीबाई आणि त्यांचे बहुजन व ब्राम्हण सहकारी यांनी 1848 साली पुण्यात 'नेटिव्ह फिमेल स्कूल्स' ही स्त्री शिक्षण संस्थेची स्थापना केली.12 या संस्थेच्या माध्यमातून महात्मा फुलेंनी सर्वप्रथम स्त्री शिक्षणाचा प्रश्न हाती का घेतला? हे स्पष्ट करताना महात्मा फुले म्हणतात. प्रथम मनात आले की, आईच्या योगाने मुलांची जी सुधारणूक होते ती फारच चांगली आहे.म्हणून प्रथम मुलींची शाळा घातली.13 स्त्री शिक्षणाविषयी महात्मा फुले पुढे म्हणतात. स्त्रियांस विद्या शिकवून त्यांची सुधारणा करणे,त्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणे मान देणे व त्यांच्या कल्याणाची काळजी बाळगणे,हे हिंदू लोकांच्या विचारांच्या विरूध्द वाटते आणि इतकेच नव्हे तर असे केले असता त्यात अधर्म घडतो अशी त्यांची समजूत पडून गेली आहे. त्यांच्यामते स्त्रियांनी निरंतर दास्यत्वात वागावे,त्यांनी विद्या शिकू नये, धर्म जाणू नये, पुरुषांच्या मंडळात जाऊ नये, पुढाऱ्यांच्या विचारात आपले मत देवू नये.सारांश कोणत्याही गोष्टीत त्यांनी पुरूषांची बरोबरी करू नये......परंतू असा वृथा अभिमान बाळगल्यामुळे आपल्या देशाची अवस्था फार खराबीस कशी मिळाली आहे. ती त्यांच्या लक्षात येत नाही. जे परोपकारी लोक या देशाच्या कल्याणाची काळजी बाळगतात त्यांस मात्र येथील स्त्रियांची दशा पाहून फार कळवळा येतो.त्यांस वाटते की,हा देश उत्तमावस्थेत यावा अशी आपण इच्छा धरिली तर हिकडील बायकांच्या स्थितीकडे अवश्य लक्ष दिल्ले पाहिजे व हरयेक प्रयत्न करून त्यांस न्याय,विद्या शिकवली पाहिजे.14 हंटर शिक्षण आयोगा समोर निवेदन सादर करताना महात्मा फुले म्हणतात. शेतकरी वर्गाला आपली मुले शाळेत पाठविण्यास उत्तेजन मिळावे आणि त्यांच्यामध्ये विद्येची गोडी उत्पन्न व्हावी म्हणून शिष्यावृत्त्यांची व सहामाही वा वार्षिक बक्षिसांची विशष प्रलोभने ठेवणे आगत्याचे आहे.15

उच्च शिक्षणा संदर्भात महात्मा फुले म्हणतात. कोणत्याही पातळीवरची शिक्षणव्यवस्था खाजगी यंत्रणेकडे सोपिवणे इष्ठ नाही. यापुढे बहूत काळापर्यंत धंदेवाईक असो,वा कारभाराविषयक शिक्षण असो सर्व पातळी वरच्या शिक्षण यंत्रणा सरकारी नियंत्रणाखालीच राहणे योग्य ठरेल.प्राथमिक आणि उच्च या दोन्ही पातळयांवरील शिक्षणाचे संवर्धन होण्यासाठी आवश्यक असणारी आस्था आणि कृपादृष्टी केवळ सरकारच दाखवू शकेल.16

ब्राम्हणवर्गातील शिक्षकांसंदर्भात महात्मा फुले लिहितात. ब्राम्हणवर्गातील शिक्षक धार्मिक बाबतीत पूर्वग्रहामुळे कनिष्ठ वर्गीयांशी फटकून वागतात. शेतकरी वर्गातील शिक्षक त्या वर्गात अधिक सहजपणे मिसळतील. त्यांच्या गरजांशी, आशाआकांक्षांशी अधिक चांगल्या रीतीने समरस होतील.17 तर फी संदर्भात महात्मा फुले असे म्हणतात की, कर भरणारे व कर न भरणारे यांच्या मुलांना प्राथमिक शाळेची फी एकास दोन या प्रमाणात असावी.18

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, 19व्या शतकातील प्रबोधना मागची वैचारीक भूमिका स्पष्ट होते.

**समारोप**

पंडिता रमाबाईंच्या कार्याची पूर्वपीठीका महात्मा फुलेंने तयार केली होती. असेच म्हणावे लागेल.



Scanned with OKEN Scanner

संदर्भ


- कीर धनंजय – महात्मा जोतीराव फुले पॉप्युलर प्रकाशन मुंबई पहिली आवृती 1968 पृष्ठ क्र 5
- कित्ता – पृष्ठ क्र 6
- कित्ता – पृष्ठ क्र 9
- डॉ. तांबोळी एन.एस. – आधुनिक जग इ.स.1453 ते 2008 निराली प्रकाशन पुणे प्रथम आवृती 2009 पृष्ठ क्र 3
- कीर धनंजय – महात्मा जोतीराव फुले पॉप्युलर प्रकाशन मुंबई पहिली आवृती 1968 पृष्ठ क्र 33
- कित्ता – पृष्ठ क्र 11
- कित्ता – पृष्ठ क्र 33
- कित्ता – पृष्ठ क्र 15
- कित्ता – पृष्ठ क्र 70
- कित्ता – पृष्ठ क्र 11
- कित्ता – पृष्ठ क्र 11
- नरके हरी (संपादन) – महात्मा फुले समग्र वाङ.मय महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई प्रथम आवृती 2013 पृष्ठ क्र 12
- कित्ता – पृष्ठ क्र 12
- कित्ता – पृष्ठ क्र 12
- कित्ता – पृष्ठ क्र 767
- कित्ता – पृष्ठ क्र 773
- कित्ता – पृष्ठ क्र 768 769
- कित्ता – पृष्ठ क्र 769

# ८. यशवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार



**मोहिते दिगंबर तुळशीदास**
सहाय्यक प्राध्यापक, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

**प्रस्तावना**

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चव्हाण यांच्या विषयी महाराष्ट्रीयन जनतेच्या मनात श्रद्धा,आदर आणि प्रेम आहे. त्यांनी दाखवलेली दूरदृष्टी आणि निर्णयामुळेच आधुनिक महाराष्ट्र घडला, राष्ट्रीय पातळीवरही त्यांनी आपल्या कर्तुत्वाने अनेक क्षेत्रे पदाक्रांत केली. यामध्ये संरक्षण मंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री या खात्याचे कामकाज त्यांनी पाहिले. त्याचसोबत त्यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वामुळेच भारताचे उपपंतप्रधान पदही चालून आले.

यशवंतराव चव्हाण हे फक्त राजकारणी नव्हते तर ते साहित्यिक देखील होते त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध उ बहुरंगी व्यक्तिमत्व लाभलेल्या यशवंतराव चव्हाणांचे आर्थिक विचार या शोधनिबंधात मांडण्याचा प्रयत्न मी केला आहे.

**यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांवरील समाजवादाचा प्रभाव**

कोणत्याही विचारवंताच्या विचारावर कोणत्यातरी तत्त्वाचा प्रभाव असतो अगदी त्याचप्रमाणे यशवंतराव चव्हाणा समाजवादी विचाराचा प्रभाव असल्याचे दिसून येते अर्थात हे समाजवादी विचार पाहण्यापूर्वी समाजवाद म्हणजे काय? त्याच पाहणे महत्त्वाचे आहे.

**समाजवाद**

संपत्तीचे उत्पादन समाजाच्या मालकीचे ठेवून सर्वांना समान मानणारी व संपत्तीचे न्याय्य वितरण करून सर्वांना एक पातळीवर आणणारी विचारप्रणाली म्हणजेच समाजवाद होय.[1]

**यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांवरील समाजवादाचा प्रभाव**

यशवंतराव चव्हाण यांच्या आर्थिक विचारांचा पाया त्यांच्या शालेय जीवनातच घातला गेला. यशवंतराव च समाजवाद, गांधीवाद आणि मार्क्सवादाचा प्रभाव होता. यशवंतरावांची समाजवादासोबतची ओळख शालेय जीवनतच झाली गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ देशात सुरू केल्यानंतर त्या चळवळीमध्ये यशवंतराव चव्हाण यांनी शालेय जीवन मारली आणि कराडमध्ये प्रभात फेऱ्या, झेंडावंदन इत्यादी कार्यक्रम घेतल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. अटकेच्या यशवंतरावांवर समाजवादाचा प्रभाव पडला कम्युनिस्टांचा जाहीरनामा भुस्कुटे याच्याकडून यशवंतरावांना वाचावयास मिळाल

यशवंतराव चव्हाण आपल्या आत्मचरित्रात कृष्णाकाठ भाग एक मध्ये येरवडा येथील तुरुंगातील आठवणींची देताना सांगतात की ,गांधीवादाच्या चर्चेबरोबर समाजवाद आणि मार्क्सवाद याही विचारांची बराकीतील या वर्गात चर्चा सु आणि त्याच पोषक असे वाडमयही आम्हा लोकांना वाचण्यासाठी मिळू लागले. आमचे राजकीय शिक्षण हे या पद्धतीने सातत्याने व मोठ्या तीव्रतेने सुरू झाले. काय वाचावे आणि काय वाचू नये असे वाटावे इतक्या पुस्तकांचा साठा तेथे जमला ह



Scanned with OKEN Scanner

एम जोशी, ह. रा. महाजनी ही तरुण मंडळी गांधीवाद स्वीकारलेल्यापैकी दिसत नव्हती त्यांच्या मनात त्यासंबंधी अनेक शंका होत्या व ते त्यावेळी विचारत असत स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी समाजवादाचा विचार आवश्यक नाही का? असे प्रश्न उभे करीत आणि त्याचे हे प्रश्न बरोबर आहे असे मला वाटे.[३]

समाजवादा संदर्भात यशवंतराव एका भाषणात म्हणतात की, समाजवादाच्या तीन विशेष निकष असतात पहिला हा की, सर्वांना विकासाची समान संधी मिळाली पाहिजे सगळेजण कायद्यासमोर समान आहेत एवढे म्हणून भागत नाही देशाच्या आर्थिक समृद्धीमध्ये हातभार लावण्याची आणि या समृद्धीचा उपभोग घेण्याची प्रत्येकाला खऱ्या अर्थाने समान संधी उपलब्ध झाली पाहिजे. जीवनमानातील विषमता नाहीशी करणे हा समाजवादाचा दुसरा निकष आहे. जीवनमान म्हणजे केवळ आर्थिक जीवन नव्हे, सामाजिक जीवनही त्यात अंतर्भूत असते उत्पादनाच्या प्रक्रियेतील शोषण थांबविणे, ही समाजवादाची तिसरी अट आहे. हे तीनही निकष आपापल्या परीने महत्त्वाचे असले, तरी आर्थिक आणि सामाजिक विषमता नष्ट करणे, हा समाजवादाचा गाभा म्हटला पाहिजे म्हणून आपण येत्या पाच दहा वर्षामध्ये ही विषमता निपटून काढली पाहिजे तरच आपली समाजवादाच्या दिशेने खरीखोरी वाटचाल चालू झालेली आहे असे म्हणता येईल.[४]

वरील विवेचनावरून सभवत: असे वाटणे शक्य आहे की, यशवंतरावांनी समाजवादाचा पूर्णपणे स्वीकार केला होता परंतु असे आपणास म्हणता येत नाही त्याचे कारण गोविंद तळवलकर त्यांच्या यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तुत्व या ग्रंथात यशवंतरावांचा सामूहिक शेतीला असणारा विरोध स्पष्ट करताना म्हणतात की, यशवंतरावांनी समाजवादी विचारांचा अभ्यास केला होता आणि त्यातील काहींचा त्यांच्यावर प्रभाव होता. मार्क्सवादाचा व त्यातही सोवियत युनियनने आर्थिक नियोजनाने जे स्वरूप स्वीकारले होते त्याच्या आकर्षणामुळे पंडित नेहरूनाही काही काळ विशेष प्रभावीत केले होते यामुळे सामूहिक शेतीचा प्रयोग निदान मर्यादित क्षेत्रात प्रथम करून पाहण्याची त्यांची कल्पना होती. कॉंग्रेसच्या नागपूर अधिवेशनात तसा ठराव आणण्यात आला चौधरी चरण सिंग यांनी या ठरावास विरोध केला. पण ठराव मंजूर झाला तथापि चरणसिंह जे उघड बोलले ते अधिवेशनास जमलेल्या बहुसंख्य कॉंग्रेस जनांचे मत होते. यामुळे ठराव संमत झाला असला तरी कोणीही तो अंमलात आणणार नाही. हे इंदिरा गांधींनी मात्र ओळखले होते. असे इंदूर मल्होत्रा यांनी त्यांच्या इंदिरा गांधींच्या चरित्रात म्हटले आहे. इंदिरा गांधींनी बघितले होते की, उत्तर भारत, ओरिसा इत्यादी राज्यातल्या जमीनदारांच्या मालकीच्या जमिनी कमी करून तुम्ही जमीन सुधारणा करण्याच्या कामी राज्य सरकारातील कॉंग्रेसजन विरोध करत आहेत. यशवंतरावांना सामूहिक शेतीची कल्पना अव्यवहारी वाटत होती. महाराष्ट्रात उत्तरे प्रमाणे जमीनदारी नव्हती तेव्हा तिकडच्या कॉंग्रेस जणांशी यशवंतरावांच्या जमणारे नव्हते. तरी त्यांना सामूहिक शेतीची योजना अव्यवहार्य वाटत होती कारण ग्रामीण भागात वाढल्यामुळे शेतकऱ्यांची सर्वात मोठी आकांक्षा स्वतःच्या मालकीची जमीन असणे ही असल्याची त्यांना जाणीव होती .म्हणून आपण सामूहिक शेतीचा पुरस्कार करत नाही. असे त्यांनी म्हटल्याचे आढळेल.[५]

**गांधीजींच्या आर्थिक विचारांच्या संदर्भातील यशवंतराव चव्हाण यांची मते**

ग्रामीण भागाचा विकास करण्याचा विचार करताना यशवंतराव ग्रामोद्योग, स्वयंपूर्ण खेडी, ग्रामस्वराज्य अशा गोष्टी करताना दिसत नाहीत. तसेच सरसकट कारखानदारी निर्माण करणे शक्य नसल्याचे कल्पना त्यांना होती. यामुळे महात्मा गांधींच्या राजकीय नेतृत्वापासून प्रेरणा घेऊनही यशवंतरावांनी ग्रामोद्योगाचा पुरस्कार केला नाही. याचा अर्थ ग्रामीण उद्योग त्याज्य मानले असा नव्हे पण हे सर्व आधुनिक शास्त्र व तंत्र याच्या आधारे केल्याशिवाय तरणोपाय नाही अशी त्यांची धारणा होती याबाबतीत पंडित नेहरू सारखी



Scanned with OKEN Scanner

त्यांची भूमिका होती. ए बंच ऑफ लेटर्स या नावाच्या नेहरूंच्या पत्राचा संग्रह आहे. त्यात त्यांना आलेली व त्यांनी लिहिले असून काही गांधीजींना लिहिलेली आहेत. एकादा नेहरूंनी गांधीजींना सरळच लिहिले आहे की, खेड्यात काही स्वयंभू उच्च आहे असे आपणास वाटत नाही. त्याचे जीवन आधुनिक यंत्रसामग्रीने सुधारण्याचे गरज आहे. या सर्व यंत्र तंत्रांचा उपयोग लोकांच्या सुखासाठी न होता सर्व समाजासाठी झाला पाहिजे हा आग्रह रास्त आहे पण या सर्वांना निरोप देण्यात काहीच हि अशी नेहरूंची धारणा होती यशवंतरावंची ही तशीच होती.[6]

### सहकार क्षेत्राविषयी मत

'महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदे'त सहकार चळवळी विषयी भाष्य करताना यशवंतराव चव्हाण म्हणता उद्योगधंद्यात सरळ प्रवेश करण्याच्या उपक्रमात आणि विशेषतः शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगात, सहकारी संघटने महत्त्व आहे. उद्योगधंद्याची सहकारी तत्त्वावर कशी परिणामकारक संघटना होऊ शकते, हे या राज्याने दाखवून दिले आहे. याब या राज्याने इतरांना अल्पशा प्रमाणात का होईना, पण मार्गदर्शन केले आहे व ते तसे आजही करीत आहे, असे मी म्हटले तर ते ठरणार नाही. सहकारी तत्त्वावर चालू असलेल्या या प्रक्रिया करण्याच्या धंद्यांना आर्थिक बाजूपेक्षा एक वेगळी अशी मह सामाजिक बाजूही आहे आणि त्याच बद्दल मी आता बोलणार आहे.

सहकारी चळवळ ही मूलतः जनतेच्या प्रयत्नांवर आधारलेली असली तरी सरकारही तिचे फार काळजीपूर्वक संगोपन आहे. याची अनेक कारणे आहेत. त्यापैकी पहिले कारण असे की, शेतकऱ्याला उद्योग धंद्यात पैसे गुंतवण्यास लावण्याचा जवळ हाच एक मार्ग आहे. दुसरे म्हणजे, ग्रामीण भागातील स्थानिक साधनसामग्रीचा प्रयोग करण्याच्या निमित्ताने बाहेरून ये भांडवलामुळे त्या भागात जे प्रश्न निर्माण होतात ते त्यामुळे टाळता येतात. शिवाय, त्याने ग्रामीण व शहरी मूल्यांक असलेले अं होऊन शहरातील व खेड्यातील लोक एका पातळीवर येतात. उदाहरणार्थ, एकदा सभेत मोठ मोठे उद्योगपती, कॉर्पोरेशनचे प्रति सरकारी अधिकारी, तंत्रज्ञ व इंजिनियर यांच्या बरोबरीने शेतकऱ्यांचे प्रतिनिधी ही जेव्हा डायरेक्टर म्हणून खांद्यास खांदा लावून ब तेव्हा ग्रामीण व शहरी हा भेद साहजिकच नष्ट होतो. याशिवाय आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा प्रकारे वाढलेले उत्पन्न स संघटनेमुळेच शक्य तितक्या जास्त क्षेत्रात वाटले जाते व त्यामुळे खऱ्या अर्थाने समाजवादी समाज रचनेचा उद्देश्य साध्य होतो.[7]

महाराष्ट्राच्या आजच्या आर्थिक विकासातील सहकार चळवळीचे महत्त्व यशवंतराव चव्हाण यानी पन्नास वर्षां ओळखले होते असे आपणास दिसून येईल.

### भूतपूर्व संस्थानिकांचे तनखे व अधिकारांबाबतची मते

भूतपूर्व संस्थानिकाचे तनखे आणि खास अधिकार हेही काढून घ्यायला हवेत. कारण हे संस्थानिक जुन्या सरंजामश अवशेष असून अशा कालबाह्य अवशेषांना समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये स्थान असू शकत नाही. संस्थानिकांचे तनखे आणि हक्क काढून घेण्याबाबत आत्तापर्यंत भरपूर चर्चा झालेली आहे. याबाबत माझी भूमिका अशी आहे, की आपण हा प्रश्न शक्य ति वाटाघाटी करून सोडवावा. कारण त्यामुळे कटुता निर्माण होणार नाही. मात्र येथे एक गोष्ट केली पाहिजे. संस्थानिकांचे तनखे : हक्क नाहीसे करण्याच्या निर्णयाबाबत तडजोड होऊ शकत नाही. आमचा पक्ष त्याबाबतीत खंबीर भूमिकेवर ठाम उभा आहे. म लवकरच आम्ही संसदेपुढे तसे विधेयक सादर करणार आहोत. संस्थानिक अजूनही खळखळ करीत आहेत. काही घटना तरतुदींची सभा पुढे करून स्वतःचा बचाव करू पाहत आहेत. मला त्यांची अडचण समजू शकते. परंतु काळ बदलला :



Scanned with OKEN Scanner

इतिहासाचा संदर्भ बदलला आहे. इतिहासाची अपेक्षा बदलली आहे, ही वस्तुस्थिती भूतपूर्व संस्थानिकांनी समजावून घेतली, तर राष्ट्रीय जीवन प्रवाहामध्ये सहभागी होण्याची ही संधी ते दवडणार नाहीत, अशी मला आशा आहे.[8]

स्वातंत्र्योत्तर कालखडातील भारतापुढील संस्थानिकांच्या विलीनीकरणाचा प्रश्न जसा महत्त्वाचा होता. तसाच तो आर्थिक दृष्ट्या सस्थानिकांच्या तनखे व खास अधिकाराचा देखील होता याबाबतीत यशवंतराव चव्हाणांनी ठाम मत व्यक्त केले होते. त्यामुळेच नंतर संस्थानिकांचे खास अधिकार व तनखे बंद करण्यात आले व खऱ्या अर्थाने संस्थानिक भारतीय राज्यघटनेतील तरतुदीनुसार वागू लागल्याचे आपल्याला दिसून येईल.

## जमीनधारणा

शेतीचा विचार करीत असताना जमीन धारणेचा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. याबाबतीत गेल्या वीस वर्षांमध्ये आपण फारसे काही साध्य करू शकलो नाही, हे कटू सत्य मान्य केलेच पाहिजे. तसे पहिले, तर या प्रश्नाचा विचार आपण अलीकडेच करू लागलेलो आहोत, असे मुळीच नाही. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीही काँग्रेस पक्षाने जमीनदारी निर्मूलनाचा कार्यक्रम पुरस्कारिला होता. त्या काळातही काही राज्य सरकारांनी जमीनधारणे संबंधी कायदे केले होते. 1937 मध्ये तेव्हाच्या मुंबई सरकारने कुळाच्या हक्काचे संरक्षण करणारे विधेयक मांडले होते. नंतर इतर राज्यांनीही तशा प्रकारचे कायदे केले. परंतु या कायद्याच्या अंमलबजावणीचे गेल्या वीस वर्षातील चित्र काय  दिसते ? शेत जमीन  कसणाऱ्याच्या मालकीची झाली पाहिजे हे तत्व मान्य झाले आहे. तसे कायदेही करण्यात आलेले आहेत आणि तरीही छोटा शेतकरी आणि शेतमजूर आहे तेथेच आहे. असे का? कारण कायदे कागदावरच राहिले त्याची अंमलबजावणी झालीच नाही म्हणून यापुढे एक दोन वर्षाच्या आत या सर्व कायद्यांची व्यवस्थित अंमलबजावणी करण्याचा निर्धार आपण केला पाहिजे. आपण तसे काही करू शकलो तरच लोकांचा आपल्यावर विश्वास बसेल नाही तर ते वैफल्याने ग्रासले जातील मोठे जमीनदार आणि शेतकरी यांच्यात असंतोष दुमसत आहे. तो वेळीच नाहीसा केला नाही तर ग्रामीण भागात हिंसाचाराचे थैमान निर्माण होईल आणि हरितक्रांतीचे सारे फायदे नाहीसे होऊन जायला वेळ लागणार नाही. म्हणून जमीन वाटपाच्या प्रश्नांची तावडतोब दखल घेतलीच पाहिजे याबाबतीत दिरगाई वा चालढकल चालणार नाही.[9]

दैनिक केसरी 1971 मध्ये दिवाळी अंकासाठी मुलाखत देताना यशवंतराव चव्हाण जमीनधारणे संदर्भात म्हणतात हरितक्रांतीचा विचार करताना खेड्यातील श्रीमंत शेतकरी व गरीब शेतकरी यांच्यातील वाढत्या विषमतेचा विचार हा आवश्यक ठरतो. आणि असा एकदा विचार करू लागलो, म्हणजे  मग जमीन सुधारणा व जमिनीवरील कमाल मर्यादा यांचाही विचार ओघाने पुढे येतो. आज खेड्यात लक्षावधी भूमिहीन आहेत, शेतमजूर आहेत, कारागीर आहेत, ते रोजगारासाठी उद्योगासाठी आणि जमिनीसाठी भुकेले आहे. त्यांच्याकडे लक्ष द्यावेच लागेल. अर्थात यासंबंधी निर्णय करताना जमिनीमधून अधिकाधिक उत्पादन कसे निघेल, शेतीसाठी आधुनिक तंत्रांचा वापर कसा करता येईल, याचाही विचार करावाच लागेल. खेड्यातून गेल्या काही वर्षात ज्या विकासाच्या योजना राबवल्या गेल्या, त्यांचा खरा फायदा सदन शेतकऱ्यांच्या पदरात पडला. छोटी शेतकरी आणि शेतमजूर हा वर्ग जवळ जवळ उपेक्षितच राहिला. अवतीभवती हरितक्रांती होत आहे, काही शेतकऱ्यांना विकास योजनांचा फायदा मिळून त्याचे उत्पन्न वाढत आहे, ते संपत्तीमान बनत आहेत. पण या वाढत्या समृद्धीचा फायदा आपल्याला काहीही मिळत नाही. ही भावना छोटा शेतकरी आणि शेतमजूर यांच्यात निर्माण झाली आणि ती वाढतच राहिली, तर त्यांच्यात वैफल्य वाढेल. खेड्यातील अर्थव्यवस्थेतील हे दोष दूर करावे लागतील. एरवी पुढच्या काही वर्षात विषमता ही अशीच वाढत राहिली, प्रसंगी ती धारदार बनेल आणि त्यातून मग स्फोटक परिस्थिती



Scanned with OKEN Scanner

निर्माण होईल. अलीकडे काही राज्यातून अशा स्फोटक परिस्थितीच्या घटना घडल्या आहेत. म्हणूनच जमीन सुधारणा व जमिनीवरील कमाल मर्यादा यांचा विचार कमप्राप्त ठरतो.[10]

**जमीन सुधारणा**

जमीन सुधारण्याच्या संदर्भात यशवंतराव यांची मते ही पुरोगामी होती अर्थात यशवंतराव चव्हाण यांचा जन्म एका सामान्य शेतकरी कुटुंबात झालेला असल्यामुळे शेतीचे मूळ प्रश्न काय आहेत याविषयी त्यांना माहिती होती. जमीन सुधारण्याच्या संदर्भात शेतीमालाला भाव मिळावा ही मागणी पन्नास वर्षापूर्वीच यशवंतराव चव्हाण यांनी केलेली आपल्याला दिसून येते अर्थात त्या संदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात की, शेतकऱ्याला त्याच्या शेतमाला बद्दल किमान वाजवी भाव मिळालाच पाहिजे हे आपल्या आर्थिक धोरणाचे एक प्रमुख सूत्र आहे शेतमालाचे उत्पादन वाढावे आणि उत्पादक व ग्राहक यांचे शोषण थाबावे, यासाठी काही नवी पावले उचलावी लागतील. त्या दृष्टीने सार्वजनिक क्षेत्रात प्रमुख अन्नधान्याची घाव खरेदी करणे इष्ट ठरेल. अशी एखादी कार खरेदी सुरू झाली, तरच शेतकऱ्यांची पिळवणूक थांबू शकेल. काही राज्य सरकारांनी या दृष्टीने पावले टाकले आहेत, हे मला माहित आहे. काही राज्यांमधील शिलकी अन्नधान्य खरेदी करण्याबावत अन्नधान्य महामंडळ पुढाकार घेत असते. परंतु एकेका वस्तूचा व्यापार सार्वजनिक क्षेत्रात घेऊन हा व्यापक प्रश्न सुटणार नाही. ग्रामीण भागातील उत्पादकांची परिस्थिती सुधारण्यासाठी गहू, तादूळ, ज्वारी आणि इतर नगदी पिके यांची खरेदी सार्वजनिक शासन यत्रणेमार्फत झाली पाहिजे हा आमच्या नव्या पुरोगामी आर्थिक धोरणातील आग्रहाचा भाग आहे. तेलबियांसारख्या इतर शेतमालाच्या व्यापारात श्रीमंत ठेकेदार अशा रितीने भाव बांधून घेतात की, त्यामुळे शेतकरी व ग्राहक या दोघांनाही नुकसान सोसावे लागते. म्हणून शेतमालाच्या व्यापारातील मध्यस्थाला आणि त्याच्या नफेबाजारीला मुळीच वाव राहणार नाही. अशा रीतीने शेतमालाची खरेदी सुरू व्हावयास हवी.[11]

**कोरडवाहू शेतीच्या प्रश्नासंदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात** की, आपण देशातील सारी जलसंपत्ती उपयोगात आणली, तरी देखील बराच मोठा भूभाग पाण्यापासून वंचितच राहणार आहे. आपण त्या कोरडवाहू शेतीचे काय करणार आहोत, हा खरा प्रश्न आहे. तो सोडवला नाही, तर देशातील गरिबीचे आपण निर्मूलन करू शकणार नाही. छोट्या शेतकऱ्यांच्या जमिनीला पाणी मिळूनही त्यांचा प्रश्न सुटलेला नाही, हे आपण पाहतच आहोत म्हणून यापुढे आपल्या ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांमध्ये बहुसंख्य उपेक्षित शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यावर विशेष भर दिला गेला पाहिजे. त्या दृष्टीनेच कोरडवाहू शेतीचा प्रश्न हाताळला पाहिजे. कोरडवाहू शेतीच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी खास कार्यक्रम संघटित केले पाहिजेत. तसेच अशा शेतामध्ये कोणती पिके घेता येतील, याचाही विचार व्हायला हवा. त्यासाठी आपल्याला कोरडवाहू शेतीचे नवे तंत्र विकसित करावे लागेल. ही शेती करणाऱ्यांना बी बियाणे आणि खते यांचा पुरवठा करण्याची आणि त्यांच्या मालाला सहकारी बाजारपेठ मिळवून देण्याची व्यवस्था करण्यासाठी वेगळ्या निधी उभारावा लागेल.[12]

**समारोप**

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यामुळेच आधुनिक महाराष्ट्र घडला तसेच आधुनिक महाराष्ट्रातील आजचे प्रश्न व त्यावरील उत्तरे यशवंतराव चव्हाण यांनी पन्नास वर्षांपूर्वीच मांडलेली होती असे आपणास दिसून येईल.



Scanned with OKEN Scanner

संदर्भ


1. विकिपीडिया - www.mnin.wikipidia.com
2. तळवलकर गोविंद - यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तृत्व मौज प्रकाशन गृह मुबई पहिले आवृत्ती 2012 पृष्ट क्रमाक 32
3. चव्हाण यशवंतराव - यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र कृष्णकाट प्रेस्टीज पब्लिकेशन पुणे 1980 नवी आवृत्ती 1987 पृष्ट क्रमाक 123, 124
4. चव्हाण यशवंतराव - भूमिका प्रेस्टीज पब्लिकेशन पुणे 1979 प्रथम आवृत्ती पृष्ट क्रमाक 94, 95
5. तळवलकर गोविंद - यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तृत्व मौज प्रकाशन गृह मुबई 2012 पहिली आवृत्ती पृष्ट 124, 125
6. कित्ता - पृष्ट क्रमांक 122 123
7. चव्हाण यशवंतराव - सह्याद्रीचे वारे मौज प्रकाशन मुबई 2012 चौथी आवृत्ती पृष्ट क्रमाक 64, 65
8. चव्हाण यशवंतराव - भूमिका प्रेस्टीज पब्लिकेशन पुणे 1979 प्रथम आवृत्ती पृष्ट क्रमाक 88
9. कित्ता - पृष्ट क्रमांक 91, 92
10. कित्ता - पृष्ट क्रमांक 130
11. कित्ता - पृष्ट क्रमांक 89
12. कित्ता - पृष्ट क्रमाक 90,91.




Scanned with OKEN Scanner